<u>नि. फौ. खटला क्र.३३/२०२५</u>

<u>निशाणी क्र.३६</u>

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०४ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : अखील यासीनसाब मुंजेवार,

**<u>वय</u>** : ५४ वर्षे, **<u>काम</u>** : मजुरी,

**<u>राहणार</u>** : वलांडी, ता. देवणी, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

दि.२६/०२/२०२५ रोजी मी रस्त्याने जात असताना पोलिसांनी माझी सही घेतली होती. माझ्यासमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. परंतु त्यामधील मजकूर मला माहिती नाही. सदर सहीला **नि.३७** देण्यात येते.

०२. **<u>साक्षीदार पूर्वीच्या कृतीवर कायम नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.</u>**

०३. सदर दिवशी पोलिसांनी मला फय्याज शेखच्या घरी पंचनाम्याकरिता बोलावले आणि माझ्यासमक्ष पंचनामा तयार केला, असे घडले नाही. मी फय्याजच्या घरी पंचनाम्यावर सही केली, असे घडले नाही. आरोपी हे माझे गावातील ईसम आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**:: <u>आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.एस. नागराळे यांनी नाकारला</u> ::**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि.२२/०४/२०२६.